| | |
|---|---|
| **MHKO110007432012** | <u>नियमित दिवाणी दावा क्र. २२३/२०१२ मधील निशाणी क्रमांक ६९ खालील आदेश</u><br><u>संजय कृष्णा परीट</u><br><u>विरुध्द</u><br><u>माणिक वसंत यादव वगैरे</u> |

साक्षीदार क्र. २ मुख्य कार्यकारी अधिकारी, हनुमान ग्रामीण बिगरशेती सहकारी पत संस्था मर्या. नागांव ता. हातकणंगले जि. कोल्हापूर तर्फे प्रस्तुतचा अर्ज हा महत्वाची कागदपत्रे दाखल करण्यासाठी केलेला आहे. सदर अर्जावर विरूध्द पक्षाने तीव्र आक्षेप नोंदविलेला आहे परंतु न्यायाच्या दृष्टीने योग्य ते आदेश करण्यास विनंती केली आहे.

२. साक्षीदार तर्फे असे कथन आहे की, न्यायालयाने मागणी केल्या प्रमाणे चौकशीवर नेमल्याप्रमाणे या दाव्याच्या कामी अत्यंत अत्यंत महत्वाची कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदरील कागदपत्रे न्यायालयाच्या कामी हजर करून घेणे महत्वाचे असलेने न्यायास मदतच होणार आहे. साक्षीदार तर्फे सदर अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे. विरूध्द पक्षा तर्फे युक्तीवाद केला की, सदरील साक्षीदार यांचा सरतपास सुरू झाला असल्याने सदर कागदपत्रे हे त्यांना हजर करता येत नाहीत त्यामुळे सदरील अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. अभिलेखाची पाहणी केली. वादीने सदर दावा हा रक्कम वसुली करीता दाखल केलेला आहे. सदर साक्षीदाराचा पुरावा हा निशाणी ५४ खाली दाखल केला आहे. परंतु विरूध्द पक्षाचे वकीलांनी आक्षेप घेतल्यामुळे संपूर्ण सरतपास व उलटतपास झाला नाही. त्यानंतर वादी तर्फे साक्षीसमन्स करिता नि. ६६ खाली अर्ज दिला होता. तो अर्ज मे. कोर्टाच्या आदेशानुसार गुणदोषावर मंजूर करण्यात आला आहे. उर्वरित सरतपास व उलटतापासाकरिता मे. कोर्टाने साक्षीदारास नि. ६८ वर साक्षी समन्स पाठवला होता व ते सदर कामात आज हजर झाले आहेत. नि. ६६ च्या आदेशाचे पालन

करून साक्षीदारा ने नि. ६९ च्या अर्जासोबत महत्वाची कागदपत्रे दाखल केली आहेत. दाखल केलेल्या कागदपत्रांचा विचार केला असता सदर कागदपत्रे दाखल करुन घेतल्यास वि.प यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. पुराव्याच्या वेळी सदरील कागदपत्रांवर विरूध्द पक्षांना उलटतपास घेण्याचा अधिकार आहे. म्हणून सदर अर्ज नामंजूर करणे संयुक्तीक वाटत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज अशंत:मंजूर करण्यात येतो.

२. सदर कामी कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

स्वाक्षरी/-
( आर. एस. मोरे )
३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पेठवडगाव

दिनांकः- ०७/०८/२०२५.
पेठवडगाव